दिनांक 27/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.9

विषय – घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे कामास मुदतवाढ मिळणेबाबत भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्यूशन प्रा.लि , विटा यांचे दिनांक 24/04/2023 रोजीचे अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 26/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणेची निविदा स्थायी समिती ठराव नं. 65 दि.29/04/2022 ने भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्यूशन प्रा.लि , विटा यांची मंजूर करणेत आली आहे. या संस्थेमार्फत निविदेनुसार काम करीत आहे. सदर निविदेची मुदत दि. दि.04/05/2023 रोजी समाप्त होत आहे. सदर कामास मुदतवाढ मिळणेकामी मक्तेदार भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्यूशन प्रा.लि , विटा यांनी दिनांक 24/04/2023 रोजीचे अर्जाने विनंती केली आहे.

सध्या सदर कामाच्या तांत्रिक मंजुरी व प्रशासकीय मंजुरी मिळणेकामी कार्यवाही सुरू असून सदर प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. तरी घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे कामास दिनांक 10/06/2023 किंवा पुढील निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत यामधील जी प्रक्रिया प्रथम होईल तोपर्यत मुदतवाढ देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 27/04/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.10

विषय – नगरपरिषदेकडील उपलब्ध रिक्षा दुरूस्त करून या पिंक रिक्षाद्वारे शहरातील महिलांना वेंडींग मशीनव्दारे सॅनिटरी पॅड उपलब्ध करून देणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी आरोग्य निरीक्षक यांची दिनांक 21/04/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

विटा शहराने मागील 5 वर्षामध्ये स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये संपूर्ण देशामध्ये प्रथम क्रमांक व स्वच्छ सर्वेक्षण 2022 मध्ये पश्चिम भारतात दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे.

त्याअनुषंगाने नाविण्यपुर्ण उपक्रम म्हणून पिंक रिक्षाद्वारे नगरपरिषदेमार्फत शहरातील महिलांना वेंडींग मशीनव्दारे सॅनिटरी पॅड उपलब्ध होणार आहे पिंक रिक्षामध्ये सॅनिटरी पॅड वेंडींग मशीन बसविलेस महिलांना घरोघरी सॅनिटरी पॅड मिळणे सोईचे होणार आहे. सदर मशीनद्वारे मिळणारे चांगल्या प्रतिचे सॅनिटरी पॅड पॅकिंगसहित प्रति नग र.रू.5/- प्रमाणे महिलांना उपलब्ध होणार आहेत. सदर रिक्षा नगरपरिषदेकडे उपलब्ध असून त्यांची किरकोळ दुरूस्ती करणे व वेंडींग मशीनची खरेदी करणेस मंजूरी देत आहे. सदरचा खर्च नगरपरिषद फंडातून करणेत यावा. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-<br>
( संतोष भोर)<br>
प्रशासक<br>
विटा नगरपरिषद, विटा